आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – रात्री ८ वा. ५ मिनीटांनी

२ ऑक्टोबर २०२३ – सोमवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे दुसरे प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त देशाची आदरांजली

- आपल्या तिसऱ्या कार्यकाळात भारत जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना विश्वास

- खादी-ग्रामोद्याेग आयोगाची उलाढाल गेल्या ९ वर्षांत चौपटीनं वाढल्याचं केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचं प्रतिपादन

- बिहार राज्यसरकारने केलेल्या जातनिहाय सर्वेक्षणाचा अहवाल प्रसिद्ध

- यंदाचा वैद्यक शास्त्रातला नोबेल पुरस्कार, कोरोना प्रतिबंधक mRNA प्रकारच्या लशींच्या निर्मितीसाठी संशोधन करणाऱ्या जोडीला जाहीर

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धेत आतापर्यंत ६० पदकं मिळवत भारत चौथ्या स्थानावर कायम

**<><><><><>**

देशभरात आज राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली.

नवी दिल्लीत महात्मा गांधी यांच्या राजघाट या समाधीस्थळी आज सर्वधर्म प्रार्थना झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री

नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी राजघाट इथं जाऊन पुष्पांजली अर्पण केली. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी विजय घाटावर जाऊन लालबहादूर शास्त्री यांना श्रद्धांजली वाहिली.

गुजरातमध्ये आज गांधी जयंतीनिमित्त मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी सर्वधर्मीय प्रार्थनेत सहभाग घेतला. साबरमती आश्रमात देखील आज विविध कार्यक्रम आयोजित केले होते.

**<><><><><>**

मुंबईत राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवन इथं बापूजी आणि शास्त्रीजींच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. राजभवन परिसरात आज स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धा इथं सेवाग्राम आश्रमाला भेट दिली आणि प्रार्थना केली.

**<><><><><>**

श्रीलंकेत प्रधानमंत्री दिनेश गुणवर्धने आणि भारताचे तिथले उच्चायुक्त यांनी आज महात्मा गांधी यांना पुष्पांजली अर्पण केली. जाफना आणि श्रीलंकेतल्या इतर शहरांमध्ये देखील आज गांधी जयंती निमित्त विविध कार्यक्रम झाले.

**बांगलादेश** मध्येही गांधी जयंती साजरी झाली. ऐतिहासिक महत्व असलेल्या नौखाली इथल्या गांधी आश्रमात गांधीजींच्या स्मरणार्थ विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. बांगलादेश मधल्या भारतीय उच्चायुक्तांनी यावेळी आयोजित परिसंवादात भाग घेतला.

**<><><><><>**

२०१४-१५ मधे खादी आणि ग्रामोद्याेग आयोगाची 30 हजार कोटी रूपयांची उलाढाल झाली असून ती आज १ लाख ३४ हजार कोटी रुपयांवर गेली आहे, असं केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी सांगितलं. ते आज मुंबईत खादी महोत्सवाचं उद्घाटन करताना बोलत होते. गेल्या काही वर्षात खादी आणि ग्रामोद्याेग क्षेत्रात भरीव वाढ झाली आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत मुंबईचं योगदान 34 टक्के आहे. यात खादी आणि ग्रामोद्योग यांचाही मोठा वाटा यापुढच्या काळात असावा, असं ते म्हणाले. महात्मा गांधी यांनी खादीला स्वातंत्र्य आंदोलनाशी जोडलं, खादीच्या प्रसाराचं कार्य आपल्याला पुढं न्यायचं आहे, असंही राणे म्हणाले.

३१ ऑक्टोबरपर्यंत हा महोत्सव चालणार असून त्यात स्वदेशी उत्पादनांना चालना देण्यासाठी प्रदर्शन भरवलं जाणार आहे. तिथं ग्राहकांना २० ते २५ टक्के सवलतीनं ही उत्पादनं मिळतील.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या स्मृतिचिन्हांचा ई-लिलाव आजपासून सर्वसामान्यांसाठी खुला झाला आहे. या महिन्याच्या ३१ तारखेपर्यंत निविदा सुरू राहणार आहेत. या लिलावातून जमा होणारी रक्कम, गंगा नदीचं पुनरुज्जीवन करण्यासाठी, नमामि गंगे प्रकल्पाला दान केली जाणार आहे. अशा प्रकारचा हा पाचवा लिलाव असून त्यात 100 रुपयांपासून 65 लाख रुपयांपर्यंतची स्मृतीचिन्हं ई-लिलावासाठी उपलब्ध आहेत. नवी दिल्लीतल्या नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टमध्ये अशा स्मृतिचिन्हांचं प्रदर्शन आयोजित केलं आहे. त्यात 150 हून अधिक उल्लेखनीय स्मृतीचिन्हांचा समावेश आहे.

<><><><><>

बिहारमधे राज्यसरकारने केलेल्या जातनिहाय सर्वेक्षणाचा १०१ पानी अहवाल आज प्रसिद्ध झाला. गेल्या वर्षभरात दोन टप्प्यांमधे राबवण्यात आलेल्या या सर्वेक्षणातली माहिती बिहारचे मुख्य सचिव विवेक कुमार यांनी जाहीर केली. बिहारची लोकसंख्या १३ कोटीहून जास्त असून त्यात अतिमागास जाती बहुसंख्य आहेत. या जातसमूहाचा वाटा एकूण लोकसंख्येत ३६ पूर्णांक १ शतांश असून त्या खालोखाल मागास जातींचा वाटा २७ पूर्णांक १२ शतांश टक्के आहे.

अनुसूचित जातींची लोकसंख्या १९ पूर्णांक ६५ शतांश टक्के असून सर्वसाधारण प्रवर्गाचे लोक १५ पूर्णांक ५२ शतांश टक्के आहेत. सर्वात कमी लोकसंख्या आदिवासींची असून ते एकूण लोकसंख्येच्या १ पूर्णांक ६८ शतांश टक्केच आहेत. देशात प्रथमच जातिआधारित गणना झाली असून त्याचा अहवाल अभ्यासूनच महाराष्ट्रात कशा पद्धतीने सर्वेक्षण करायचं याचा निर्णय घेऊ असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं.

महाराष्ट्रात विविध समाजाचे आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित असताना जातनिहाय जनगणना हाच एक उपाय आहे. त्यामुळे बिहारच्या धर्तीवर महाराष्ट्रात जातनिहाय जनगणना करावी, आणि याचा कालबध्द कार्यक्रम राज्य सरकारने जाहीर करावा, अशी मागणी विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**<><><><><>**

कोरोना प्रतिबंधक mRNA प्रकारच्या लशींसाठींच्या निर्मितीसाठी संशोधन करणाऱ्या जोडीला यंदाचा वैद्यक शास्त्रातला नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. हंगेरीच्या प्रा. कॅटलिन कारिको आणि अमेरिकन शास्त्रज्ञ ड्रू वेसमन हे या पुरस्काराचे मानकरी असून अमेरिकेतल्या पेनसिल्वेनिया विद्यापीठात कार्यरत आहेत. कोरोनापूर्वीही प्रायोगिक तत्त्वावर हे तंत्रज्ञान वापरात होते. मात्र आता लाखो

लोकांना याचा लाभ होतो आहे. कर्करोगासह इतर आजारांच्या उपचारांवरही या तंत्रज्ञानाचा वापर करता येईल का, यावर सध्या संशोधन सुरू आहे. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आवश्यक प्रथिनं तयार करण्याचं प्रशिक्षण या तंत्राने पेशींना दिलं जातं.

<><><><><>

येत्या दोन ते तीन दिवसात बिहार, झारखंड, उप हिमालयाचा भाग असलेला पश्चिम बंगाल, उत्तर ओदिशा, उत्तर छत्तिसगड या राज्यांमधे जोरदार ते अति मुसळधार पावसाच्या शक्यतेचा इशारा  हवामान विभागानं दिला आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात  उद्या हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या  पावसाची शक्यता असल्याचा अंदाजही  हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

<><><><><>

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आतापर्यंत ६० पदकं पटकावत भारतानं पदकतालिकेत आपलं चौथं स्थान कायम राखलं आहे. त्यात १३ सुवर्ण, २४ रौप्य आणि २३ कांस्य पदकांचा समावेश आहे.

आज महिलांच्या लांब उडी स्पर्धेत अँसी सोजन हिनं रौप्यपदक पटकावलं. ३ हजार मिटर स्टीपलचेस स्पर्धेत भारताच्या पारुल चौधरी हिला रौप्य तर प्रिती लांबा हिला कांस्य पदक मिळालं. तर, मिश्र 4X400 मीटर रिले स्पर्धेत मुहम्मद अजमल, आर. वित्या रामराज, राजेश रमेश, आणि सुभा वेंकटेशन या भारतीय चमूनं रौप्य पदक पटकावलं.

आशियाई क्रीडा स्पर्धेत बीडच्या अविनाश साबळेनं काल सुवर्णपदक पटकावलं. त्याबद्दल आकाशवाणीशी बोलताना त्याचे वडील मुकुंद साबळे यांनी आनंद व्यक्त केला…

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र – रात्री ८ वा. ५ मिनीटांनी
२ ऑक्टोबर २०२३ – सोमवार

**होल्ड - मुकुंद साबळे बाइट**

**<><><><><>**

जगाला भारतात भविष्याची चाहूल जाणवत असून आपल्या तिसऱ्या कार्यकाळात भारत जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केला. मध्यप्रदेशात ग्वाल्हेर इथं जाहीर सभेत ते बोलत होते. इतर कोणत्याही सरकारने वर्षभरात केलेलं काम आपल्या सरकारने केवळ एका दिवसात केलं असं ते म्हणाले. मध्यप्रदेशातल्या विविध विकास कामांचं लोकार्पण आणि पायाभरणी आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाली. शेतकरी, महिला आणि मागसवर्गिय दुर्बल घटकांसाठी केंद्रसरकार करीत असलेल्या कामाची माहिती त्यांनी दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राजस्थानातल्या चित्तोडगड इथं सात हजार कोटी रूपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. मागास भागांच्या विकासाला आपल्या सरकारचं प्राधान्य असल्याचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. जनतेची दिशाभूल करून काँग्रेस पक्ष राजस्थानात सत्तेत आला असल्याची टीका करुन ते म्हणाले की तो सरकार चालवू शकणार नाही.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात बिहार, झारखंड, उप हिमालयाचा भाग असलेला पश्चिम बंगाल, उत्तर ओदिशा, उत्तर छत्तीसगड या राज्यांमधे जोरदार ते अति मुसळधार पावसाच्या शक्यतेचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.
मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात उद्या हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याचा अंदाजही हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**//<><><><><>//**